REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# आजच्या दलित स्त्री जीवनावर जागतिकीकरणाचे झालेले परिणाम

प्रा.डॉ. संजय संभाजी लांडगे
मराठी विभाग प्रमुख, ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

## प्रस्तावना :



जागतिकीकरण हा विषय सर्वांना बऱ्या - वाईट पध्दतीने व्यापणारा, गुंतागुंतीचा आणि व्यापक विषय आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया माणसाच्या मनापासून भौतिकतेपर्यंत आवडी निवडीपासून वस्तूपर्यंत अशा अनेक अंगानी पसरलेली आहे. जागतिकीकरणाच्या खुल्या आर्थिक धोरणांमुळे माणसांच्या भौतिक प्रगतीमध्ये वाढ झाली असली तरी सामाजिक-आर्थिक पातळीवर मात्र फार मोठा दबाव त्याला सहन करावा लागतोय जागतिकीकरणात स्पर्धा हा मूलमंत्र आहे..

आज संपूर्ण भारतामध्ये जागतिकीकरण, उदारीकरणाच्या नावाने खुली, खाजगी नफयावर आधारित अर्थव्यवस्था राज्य करत आहे. व्यवसायावर आधारित जातीचे स्वरुप या जागतिकीकरणाच्या युगात येईपर्यंत बऱ्याच प्रमाणात नाहीसे झालेले असले तरी उच्चनिच्चतेची मानसिकता अजूनही कायम आहे हेच दिसून येते. आधुनिकीकरणाचे तत्वज्ञान मांडणाऱ्या जागतिकीकरणाला जातीयवाद आणि पुरुषप्रधानता संपवण्यापेक्षा त्यांचा ही वापर आपल्या नफयासाठी करण्यात आणि त्याची मानसिकता टिकवण्यातच रस आहे.विकासाचे स्वप्न दाखविणाऱ्या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेने घराघरात पोहोचलेल्या टीव्ही सारख्या प्रसारमाध्यमांतून एका बाजूला सौंदर्यस्पर्धा, फॅशन शो, जाहिराती, परंपरागत सास- बहू मालिका यांच्याव्दारे स्त्रिला दुय्यम दर्जाची वस्तू म्हणूनच पुढे आणले आहे.

वाढती महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षण, महागडी आरोग्यव्यवस्था यांचा अर्थ गरिबांनी अधिक गरीब आणि श्रीमंतानी अधिक श्रीमंत व्हावे असेच आहे. जागतिकरणाच्या व्यवस्थेमुळे अशा प्रकारे जी गरीब- श्रीमंत विषमता भयावह पध्दतीने वाढत आहे, तिचा फटका परंपरेने गरिब असलेल्या दलितांनाच सर्वात जास्त बसत आहे. तेव्हा या व्यवस्थेमुळे खरेतर श्रमाची लूट करणारी व्यवस्थाच टिकवली जात आहे. तेव्हा आज जागतिकीकरणाविरुध्द लढणेही अत्यंत आवश्यक बनले आहे.

आज जागतिकीकरणाच्या स्वीकाराला तब्बल २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. वित्त भांडवलशाही आणि त्यापूर्वीही अस्तित्वात असणारी शोषणाची संख्या म्हणजे जातीव्यवस्था आणि पुरुषसत्ता यांचा एकत्रित शोषणातून स्त्रीशोषणाचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे. २००० मधील गुजरातमधील वंशसंहाराची मालिका, खैरलांजी हत्याकांड, दिल्लीतील सामूहिक बलात्कार प्रकरण, देशभरात जात जमात पंचायती सक्रीय होत जाऊन जातीच्या प्रतिष्ठेसाठी केले जाणारे खून, गर्भातच मुलींना मारुन टाकण्याच्या वाढत्या घटना, प्रेमाच्या नावाखाली मुलींचे केले जाणारे खून इत्यादी घटना स्त्रीशोषणाची त्रीवता अधोरेखित करीत आहेत.

चातुर्वर्ण आणि अराजक संगणकाच्या काळानंतर उदयाला आलेली जातीव्यवस्था या समाजव्यवस्थांमध्ये स्त्रीशोषण अधिकाधिक खोलवर होत गेले. व्रत, वैकल्ये, विधी, धर्मशास्त्र, पुराणे, श्रुती, स्मृती पुरुषसत्ताक होत्या. यातून स्त्रियांना

अपत्यनिर्मिती करणारे यंत्र, एक उपयुक्त वस्तू म्हणून बघितले गेले. धर्मसंस्कार, विधी, व्रतवैकल्यांतून स्त्रियांच्या जननक्षमतेवर पुरुषांचे, जाती वर्णाचे वर्चस्व भक्कम करण्याचा प्रयत्न केला गेला. अनेक व्रत वैकल्ये इत्यादीतून जुन्या पुरुषसत्ताक जातवर्ण वर्चस्ववादी मूल्यांचे पुनरुज्जीवन केले गेले. आजही त्याची अनूभूती आपण घेत आहोत. रामनवमी, कृष्ण जन्माष्टमी, रक्षाबंधन इ.ला उत्सवाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

हा इतिहास आजचे स्त्रीशोषणाचे वास्तव समजावून घेताना लक्षात घ्यावा लागतो. कारण आज ज्या प्रकारे स्त्रियांवर लैंगिक, शारिरीक हिंसा करण्यात येत आहे. त्याचे खापर अनेकजण पाश्चात्य संस्कृती, इंडियाची संस्कृती म्हणून स्वीकारत आहेत. अंधानुकरण केले जात आहे. म्हणून हिंसा होणारच असे प्रतिपादित करीत आहेत. १९व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक प्रक्रियांचे नेमके विश्लेषण झाल्याशिवाय अशा प्रश्नांची सोडवणूक करता येणार नाही असे सांगितले होते.

वास्तविक पाहता आजच्या दलित स्त्रीचे जीवन जागतिकीकरणामुळे अमुलाग्र बदललेले असले तरी जातीव्यवस्थेबाबत समाजाची मानसिकता पूर्णपणे बदललेली दिसून येत नाही. त्यामुळे शहरी भागातील दलित स्त्रियांपेक्षा ग्रामीण भागातील दलित स्त्रियांवर अन्याय अत्याचारांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. याचे कारण जागतिकीकरणामुळे बदललेली जीवनशैली व मानसिकतेतील बदल हे ग्रामीण भागापर्यंत हव्या त्या प्रमाणात पोहोचलेच नाहीत. याऊलट शहरी दलित स्त्री अनेक क्षेत्रात धाडसाने पाऊल टाकताना दिसते. तिच्यातल्या न्यूनगंड नाहिसा झाला असून आत्मभान प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## समारोप

स्त्रियांच्या शोषणाचे एकंदरीत स्वरूप पाहिले असता सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, मानसिक, शारीरिक व लैंगिक शोषणाचा अभ्यास केला असता भारतीय संस्कृतीचा प्रत्येक समाजजीवनावर झालेला परिणाम, सर्व जातिधर्मातील व्यक्तींच्या वृत्ती-प्रवृत्ती, रूढी-परंपरेने वागत असलेल्या व्यक्ती आणि त्याची खोलपर्यंत गेलेली मुळे याचे दलित समाजावर, त्यातल्या त्यात दलित स्त्रियांवर होत असलेले परिणाम, त्याची दाहकता आजही दिसून येते. पिढ्यान् पिढ्या दलित समाजावर विशेषकरून दलित स्त्रियांवर झालेले अन्याय आजही कमी झालेले नाहीत. याउलट आजही दलित समाजावर अन्याय होत असून दलित स्त्रियांवरील अत्याचाराचे सत्र सुरूच आहे. म्हणूनच इथे स्त्रियांवर झालेले अन्याय, अत्याचार, शोषण याचा विचार मांडला आहे. दलित स्त्रियांवर होणारे - अन्याय, अत्याचार, शोषणामागे त्यांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य आणि असाह्यता या गोष्टी कारणीभूत असल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष

१) सवर्ण स्त्रियांना केवळ 'स्त्री' म्हणून दुय्यमत्व स्विकारावे लागले, तर दलित स्त्रियांना 'स्त्री' म्हणून तसेच 'दलित' म्हणून दुय्यमातले दुय्यम जीवन वाट्याला आल्याचे दिसून येते.

२) दलित आत्मकथनातील स्त्रियांच्या सामाजिक समस्यांचे विविध प्रकार आढळतात.

३) आजची दलित स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवताना दिसते.

४) दलित स्त्रियांच्या वाट्याला मानसिक ताण-तणाव, छळ, आपमान इ. प्रसंग वारंवार वाट्याला येताना दिसतात.

५) अंधश्रध्दा, रूढी-परंपरा, दरिद्र्य, शिक्षणाचा अभाव, धार्मिक व जातिव्यवस्था दलित स्त्रियांच्या प्रगतीत अडसर ठरताना दिसतात.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने आजची दलित स्त्री राजकारणातील सत्तेच्या माध्यमातून जनतेची सेवा करताना दिसून येते.

७) जागतिकीकरणामुळे बदलेल्या जीवनशैलीचा, मानसिकतेचा परिणाम केवळ शहरी दलित स्त्रियांवरच झालेले दिसून येते. जागतिकीकरणाचे वारे ग्रामीण भागापर्यंत योग्य प्रमाणात पोहोचले नसल्यामुळे ग्रामीण दलित स्त्रीयांवर आजही अन्याय-अत्याचार होताना दिसून येतो.

**संदर्भग्रंथ :-**

१) जाधव मनोहर- दलित स्त्री आत्मकथने, २००५, पृष्ठ क्र. ५६.
२) गीता साने- भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९९७, पृष्ठ क्र. २५.
३) डॉ. फडके भालचंद्र- दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७, पृष्ठ क्र. ७४.
४) डॉ. किरवले कृष्णा- दलित चळवळ आणि दलित साहित्य, मॅजिक प्रकाशन, पुणे, जून १९९६, पृष्ठ क्र. ३३.
५) डॉ. मांडे प्रभाकर- दलित साहित्याचे निरोळेपण, धारा औरंगाबाद, पृष्ठ क्र. २७.
६) कऱ्हाडे सदा- दलित साहित्याच्या निमित्ताने, मुंबई सत्यकथा, जुलै १९७०, पृष्ठ क्र. २३.